आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२८  ऑक्टोबर २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रबी हंगामासाठी खतांवर ३७ हजार ९५२ कोटी अनुदान देण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय, आठव्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींना मंजुरी

- भारत हवामान बदलाचा सामना करण्यासाठी ठोस पावलं उचलत असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता /अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांसाठी आणखी ११ हजार कोटी रुपयांच्या वितरणाला मंजुरी

- नक्षलवादी बंडी प्रकाश आणि पी प्रसाद राव यांचं आत्मसमर्पण

**आणि**

- महिला क्रिकेटमधे एकदिवसीय क्रिकेट मानांकनात स्मृती मंधाना अग्रस्थानी

**<><><><><>**

रबी हंगामासाठी खतांवर ३७ हजार ९५२ कोटी अनुदान देण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक आज नवी दिल्लीत झाली, त्यानंतर वार्ताहरांशी बोलताना माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. यामुळे शेतकऱ्यांना वाजवी दरात खतं उपलब्ध होतील, असं वैष्णव म्हणाले. खतांचे आंतरराष्ट्रीय दर लक्षात घेऊन खतांच्या अनुदानाचे नवे दर निश्चित केल्याचं त्यांनी सांगितलं.

आठव्या वेतन आयोगाच्या संदर्भ अटींना आज केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. विविध मंत्रालयं, राज्य सरकारं यांच्याशी चर्चा केल्यानंतर या संदर्भ अटी निश्चित केल्या गेल्या, असं वैष्णव यांनी सांगितलं. न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांच्या अध्यक्षतेखाली आठवा वेतन आयोग अठरा महिन्यांच्या आत आपल्या शिफारशी करेल, याचा लाभ ५० लाख केंद्रीय कर्मचाऱ्यांना होणार आहे, असं वैष्णव म्हणाले.

**<><><><><>**

भारत हवामान बदलाचा सामना करण्यासाठी वचनबद्ध असून त्या दिशेनं ठोस पावलं उचलत असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज नवी दिल्लीत आयएसए अर्थात आंतरराष्ट्रीय सौर संघटनेच्या आठव्या अधिवेशनाला संबोधित करत होत्या. हवामान बदलाचा संपूर्ण जगावर गंभीर परिणाम होत आहे. त्याचा सामना करण्यासाठी तातडीने आणि ठोस पावलं उचलण्याची गरज असून त्यासाठी सूर्य हा सौर उर्जेचा शाश्वत स्त्रोत असल्याचं राष्ट्रपतींनी सांगितलं.

**- - होल्ड... बाईट - राष्ट्रपती - -**

अनेक देशवासीय आज छठपूजेच्या निमित्तानं सूर्याचं पूजन करत आहेत. याच काळात सुरू झालेलं हे अधिवेशन म्हणजे खऱ्या अर्थानं सौर उर्जेसाठीच्या जागतिक सहकार्याचं प्रतीक असल्याचं नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी म्हणाले.

चार दिवस चालणाऱ्या या संमेलनात १२४ देशातले विविध विभागांचे प्रतिनिधी आणि ४०हून अधिक देशांचे मंत्री उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटला राज्य सरकारनं मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाच्या मुंबईत झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. यानुसार व्हीएमयू अर्थात विकसित महाराष्ट्र व्हिजन मॅनेजमेंट युनिट गठित करण्यात येणार आहे. शाश्वत नागरी आणि शहरी विकास, प्रगतीशील शेती, सर्वसमावेशक शिक्षण आणि कौशल्य विकास तसंच सुशासन हे या उपक्रमांचं उद्दिष्ट आहे.

याशिवाय मंत्रिमंडळानं आज सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गाच्या सुधारित खर्चाला, तसंच सामान्य प्रशासन विभागांतर्गत राजशिष्टाचार या उपविभागाचा विस्तार करायला मान्यता दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आल्यानंतर उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईपोटी आणखी ११ हजार कोटी रुपये पुढच्या १५ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली.

<><><><><>

गुजरातमधे लोथल इथं प्रस्तावित असलेल्या राष्ट्रीय समुद्री नौवहन वारसा संकुलाच्या बोधचिन्हाचं अनावरण आणि संशोधन अहवालाचं प्रकाशन केंद्रीय बंदरं, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या हस्ते आज मुंबईत इंडिया मेरिटाईम वीकच्या दुसऱ्या दिवशी झालं. भारताचा समुद्री नौकानयन क्षेत्रातला हजारो वर्षांचा प्रवास हा फक्त भारताचा नसून सर्व खंडांमधला परस्पर आदर आणि भागीदारीचं प्रतीक आहे, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. नौवहन वारसा दिनाचं उद्घाटनही सोनोवाल यांनी केलं.

<><><><><>

पर्यावरण संवर्धनात भारताचं योगदान अधोरेखित करण्यासाठी मुंबई वातावरण सप्ताह जागतिक परिषद आयोजित केली जाणार असल्याचं  मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत सांगितलं. मुख्यमंत्र्यांनी यावेळी परिषदेच्या बोधचिन्हाचं प्रकाशनही केलं.  १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान मुंबईत होणाऱ्या या परिषदेत ३०हून अधिक देशातले पर्यावरण तज्ञ आणि अभ्यासक सहभागी होतील असा अंदाज आहे.

<><><><><>

नक्षलवाद्यांचे दोन मोठे नेते बंडी प्रकाश आणि पी प्रसाद राव यांनी आज तेलंगणा पोलिसांसमोर हैदराबाद इथं शरणागती पत्करली.  प्रकाश हा मंचेरियल जिल्ह्यातल्या रहिवासी असून शाळकरी वयातच तो नक्षलवादी चळवळीशी जोडला गेला होता. प्रसाद राव हा गेल्या सतरा वर्षांपासून केंद्रीय समितीचा सदस्य असून नक्षलवादी चळवळीशी गेल्या चाळीस वर्षांपासून जोडलेला होता. जहाल नक्षलवादी नेता किशनजी याच्या नेतृत्वाखाली त्याने चळवळीत काम केलं आहे. आरोग्याच्या समस्यांमुळे प्रसाद रावनं शस्त्र खाली ठेवण्याचा निर्णय घेतल्याचं बोललं जात आहे. तेलंगणामधे अजूनही ६४ नक्षलवादी कार्यरत असून शरण येणाऱ्यांना सरकार मदत करेल, असं पोलीस महासंचालक शिवधर रेड्डी  यांनी सांगितलं.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे एकदिवसीय क्रिकेटच्या मानांकनात भारताच्या स्मृती मंधानानं अग्रस्थान मिळवलं आहे. या मानांकनात तिची गुणसंख्या ८२८ आहे. दुसऱ्या क्रमांकावर

असलेल्या ऑस्ट्रेलियाच्या अॅशले गार्डनरपेक्षा ती शंभराहुन अधिक गुणांनी पुढं आहे. तिची सलामीची जोडीदार प्रतिका रावल ५६४ गुणांसह २७ व्या स्थानावर आहे.

गोलंदाजीत, इंग्लंडची सोफी एक्लेस्टोन  ७४७ गुणांसह अग्रस्थानी आहे.

**<><><><>**

मोंथा चक्रीवादळ आंध्रप्रदेशाच्या किनाऱ्याजवळ धडकण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे, असं हवामान विभागानं म्हटलं आहे. चक्रीवादळामुळे ९० ते शंभर किलोमीटर प्रति तास वेगानं वारं वाहत आहे. तसंच आंध्रप्रदेशाच्या किनाऱ्यावर मोठ्या लाटा उसळत आहेत. त्यामुळे हवामान विभगानं आंध्र प्रदेशातल्या १९ जिल्ह्यांना अतिजोरदार पावसाचा इशारा दिला आहे. मुख्यमंत्री एन चंद्राबाबु नायडू आणि उप मुख्यमंत्री पवन कल्याण यांनी चक्रीवादळामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीचा आढावा घेतला. आणि प्रशासनाला वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या भागात मदत आणि बचावकार्य करण्याच्या सूचना दिल्या.

आंध्रप्रदेश, तमिळनाडू, तेलंगणा, पुद्दुचेरी, ओदिशा, छत्तीसगड या राज्यांमधे मदत आणि बचावकार्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची २६ पथकं तैनात केली आहेत. तर १९ पथकं राखीव ठेवली आहेत.

**<><><><>**

सूर्यपूजेचा उत्सव म्हणून ओळखला जाणाऱ्या छठ उत्सवाचा आज सकाळी उगवत्या सूर्याला प्रार्थना करून, श्रद्धा, भक्ती आणि आनंदाच्या वातावरणात समारोप झाला. महिलांनी नद्या, तलाव आणि जलाशयांमध्ये उभे राहून सूर्यदेवाची प्रार्थना केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी छठ पूजेत सहभागी झालेल्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

**<><><><>**

अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू यांनी इटानगरमध्ये 69 व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा  2025 अंतर्गत 17 वर्षांखालील बॉक्सिंग या स्पर्धेचे उद्घाटन केले. राज्यात ही स्पर्धा प्रथमच होत आहे.

**<><><><>**

युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या प्रमुख उपक्रमानं दोन कोटींपेक्षा अधिक नोंदणींचा टप्पा पार केला आहे. केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी ही अभिमानाची बाब असल्याचं सांगितलं.

**<><><><><>**

ज्येष्ठ लेखक बाबू बिरादार यांचं आज नांदेड जिल्ह्यात देगलूर इथं निधन झालं. ते ७५ वर्षांचे होते.

बिरादार यांच्या, मातीखालचे पाय, कावड, गोसावी, अग्निकाष्ठ, अंत:पुरूष, संभूती या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. ४१ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद त्यांनी भूषवलं होतं.

**//><><><><>//**